दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि. ०७ ऑक्टोबर २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## महिला अत्याचारातील पंचकर्म; डॉक्टरला तीन वर्षांनी अटक

**शिर्डी :** महिला अत्याचाराच्या गुन्ह्यात तीन वर्षांपासून फरार असलेल्या पंचकर्म आयुर्वेद डॉक्टरला शिर्डी पोलिसांनी कल्याण येथून अटक केली. यशवंत जयराम पाटील (४२, रा. आडीवली, कल्याण) याच्याविरुद्ध २०२३ मध्ये शिर्डी पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३७६, ३७७ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. उपचाराच्या बहाण्याने अत्याचार केल्याची फिर्याद महिलेने दिली होती. गुन्हा दाखल होताच पाटील मोबाईल बंद करून घर व दवाखाना बंद करत फरार झाला होता. तांत्रिक विश्लेषण, मोबाईल टॉवर लोकेशन व गुप्त माहितीच्या आधारे तो आडीवलीत लपल्याचे समोर आले. मानपाडा पोलिसांच्या मदतीने सापळा रचून त्याला अटक करण्यात आली. पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# संगमनेरात ७६ लाखांचा गांजा जप्त

## १५२ किलो गांजाची वाहतूक; दोघे ताब्यात, तिघे फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

नाशिक-पुणे महामार्गावरून संगमनेरच्या दिशेने टाटा नेक्सॉन कारमधून मोठ्या प्रमाणात गांजाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर संगमनेर शहर पोलिसांनी साईखिंडी फाटा येथे सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी १५२.६१ किलो गांजा जप्त केला असून, त्याची किंमत ७६ लाख ३० हजार ५०० रुपये आहे. गांजासह वाहन व इतर मुद्देमाल असा एकूण ८८ लाख ७७ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.



पोलिसांना गांजाची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर नाशिक-पुणे महामार्गावर संशयित वाहनाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. साईखिंडी फाट्याजवळ पांढऱ्या रंगाची टाटा नेक्सॉन कार संशयास्पदरीत्या जाताना आढळून आल्यानंतर पोलिसांनी ती अडवून तपासणी केली. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ गांजा व वाहन ताब्यात घेत संबंधित दोघांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८१९/२०२६ नुसार अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गांजाची वाहतूक करणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, गांजा पुरविणारा तसेच विक्रीसाठी घेणाऱ्या व्यक्तींसह एकूण पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तीन आरोपी सध्या फरार असून, पोलिसांकडून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.दरम्यान, एवढ्या मोठ्या प्रमाणात गांजा नेमका कुठून आणण्यात आला, तो संगमनेरमार्गे कुठे नेण्यात येत होता आणि या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

जप्त करण्यात आलेल्या गांजाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहनासह इतर मुद्देमालाचीही चौकशी केली जात आहे. या कारवाईमुळे संगमनेर परिसरातून होणाऱ्या अमली पदार्थांच्या अवैध वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## लग्नाच्या आमिषाने महिलेवर अत्याचार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** लग्नाचे आमिष दाखवून मागील पाच वर्षांपासून वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवल्याचा आणि आता जातीवाचक अपशब्द वापरून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार वैजापूर येथे समोर आला आहे. याप्रकरणी ३० वर्षीय पीडितेच्या फिर्यादीवरून चेतन राजू चव्हाण (३०, रा. धरणग्रस्त नगर, वैजापूर) याच्याविरुद्ध वैजापूर पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला वैजापूर येथील रहिवासी असून एका खासगी रुग्णालयात नर्स म्हणून नोकरी करते. सन २०२१ पासून २५ सप्टेंबर २०२६ पर्यंतच्या कालावधीत आरोपीने विवाहाचे आमिष दाखवून फिर्यादीसोबत वेळोवेळी शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

दरम्यान, मागील आठ दिवसांपासून आरोपीने पीडितेला जातीवाचक अपशब्द वापरून अपमानित केले तसेच याप्रकरणी पोलिसांत तक्रार केल्यास आई-वडिलांची बदनामी करण्याची आणि जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी भागवत फुंदे करत आहेत.

## पीएसआय शेलार यांची राष्ट्र सह्याद्री कार्यालयास सदिच्छा भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** पोलीस दलातील २५ वर्षांच्या प्रदीर्घ, निष्कलंक व धाडसी उत्कृष्ट सेवेबद्दल भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचे मानाचे 'उत्कृष्ट सेवा पदक' जाहीर झालेले पोलीस उपनिरीक्षक किरणराव शेलार यांनी नुकतीच 'दैनिक राष्ट्र सह्याद्री'च्या शिर्डी विभागीय कार्यालयास सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी शिर्डी कार्यालय प्रमुख अशोक दुशिंग यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



पोलीस उपनिरीक्षक किरणराव शेलार यांनी आपल्या २६ वर्षांच्या सेवाकाळात श्रीरामपूर, लोणी, राहुरी, राहाता आणि शिर्डी यांसारख्या संवेदनशील भागांत सेवा बजावताना गुन्हेगारीवर कठोर वचक निर्माण केला आहे. श्रीरामपूरमधील दहशतवादी गुन्हेगारी टोळ्यांचा बिमोड करणे असो वा चेन स्नॅचिंगसारख्या गंभीर गुन्ह्यांतील अट्टल आरोपींना जेरबंद करणे असो, प्रत्येक कठीण प्रसंगात त्यांनी आपली कर्तव्यनिष्ठा सिद्ध केली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच क्लिष्ट गुन्ह्यांचा यशस्वी उलगडा करण्यातील त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत अहिल्यानगर पोलीस दलाच्या शिफारसीवरून त्यांना नुकतेच केंद्र सरकारच्या 'उत्कृष्ट सेवा पदकाने' सन्मानित करण्यात आले आहे. सध्या शेलार हे शिर्डी वाहतूक शाखेत पोलीस उपनिरीक्षक पदावर अत्यंत यशस्वीपणे कार्यरत असून, त्यांच्या योग्य व चोख वाहतूक नियोजनामुळे शिर्डीतील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होऊन या शाखेचा मान अधिक उंचावला आहे.

या सत्कार प्रसंगी पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रशांत इंगळे, भाजपाचे प्रांतिक सदस्य नानासाहेब शिंदे य उपस्थित होते.

## श्रीगोंद्यातील १० लाखांच्या सिगारेट चोरीचा छडा!

### पुण्यातून तिघे ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** शहरातील बायपास रोडवरील साहिल ट्रेडर्सचे शटर फोडून तब्बल १० लाख ५ हजार ८०० रुपये किमतीच्या सिगारेटचे बॉक्स चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छडा लावला आहे. या प्रकरणात पुणे जिल्ह्यातील तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, चोरीस गेलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.




पोलिसांनी ताब्यात घेतलेल्यांमध्ये व्यंकटेश उर्फ हर्षल परशुराम जाधव (रा. चाकण, पुणे), गोविंद लालू रूपवते, वीरप्पा उर्फ सचिन जगन्नाथ येरे आणि संजय उर्फ पंकज सर्वण वर्मा (सर्व रा. सद्गुरुनगर, भोसरी) यांचा समावेश असल्याची माहिती देण्यात आली आहे.

४ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री श्रीगोंदा बायपासवरील रिव्हर पार्क बिल्डिंगमधील साहिल ट्रेडर्सचे शटर फोडून विविध कंपन्यांच्या सिगारेटचे बॉक्स चोरून नेण्यात आले होते. या प्रकरणी श्रीगोंदा पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.गुन्ह्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत संशयितांचा माग काढला. पुणे परिसरातून संबंधितांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पुढील तपास श्रीगोंदा पोलिसांकडून सुरू आहे.

## ट्रॅक्टर विहिरीत पडून शिरसगावच्या संजय गवारे यांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथील संजय जगन्नाथ गवारे (वय ५०) यांचा ट्रॅक्टर विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात विहिरीत काम करणारा एकजण जखमी झाला आहे. सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारास श्रीरामपूर-पुणतांबा मार्गावरील गोंधवणी शिवारात ही घटना घडली.

गोंधवणी परिसरातील लबडे यांच्या विहिरीतील गाळ काढण्याचे काम सुरू होते. त्यासाठी ट्रॅक्टर तेथे नेण्यात आला होता. संजय गवारे हे ट्रॅक्टर पुढे घेण्यासाठी गेले असता ट्रॅक्टर सुरू करण्यापूर्वीच रिव्हर्स गिअरमध्ये असल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. ट्रॅक्टर सुरू होताच तो अचानक मागे जाऊ लागला. काही समजण्याच्या आत ट्रॅक्टर थेट विहिरीत कोसळला. या दुर्घटनेत संजय गवारे यांचा मृत्यू झाला.

घटनेच्या वेळी विहिरीत दोन जण काम करत होते. ट्रॅक्टर विहिरीत पडल्याने त्यापैकी एकजण जखमी झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.

संजय गवारे यांच्या पश्चात आई, भाऊ, एक मुलगा, एक मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या आकस्मिक निधनाने शिरसगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावावर शोककळा पसरली आहे.

## चांभुर्डीत घरफोडी : एक लाखाचे सोन्याचे दागिने लंपास

### दरोड्यानंतर आता घरफोड्यांचे सत्र सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील चांभुर्डी येथे बंद घर फोडून चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारला. घराचा कडी-कोयंडा व कुलूप तोडून आत प्रवेश करत कपाटातील १ लाख १ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून बेलवंडी पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीगोंदा तालुक्यात निमगाव खलू मढेवडगाव व आता चांभुर्डे येथे एकापाठोपाठ एक घडलेल्या घर फोडी व दरोड्याच्या घटनेमुळे परिसरात सर्वत्र खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी दरोडा

**श्रीगोंदा तालुक्यातील निमगाव खलु त्यानंतर मढेवडगाव व त्यानंतर आता चाभुर्डी त्यामुळे तालुक्याचे तालुक्यात दरोड्याचे सत्र सूरू झाले की काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, राहुल पंढरीनाथ गायकवाड (वय ४५, रा. चांभुर्डी) हे ४ ऑक्टोबर रोजी दुपारी घराला कुलूप लावून कौटुंबिक कारणास्तव इंदापूर येथे गेले होते. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास ते घरी परतले असता घराचा दरवाजा फोडल्याचे निदर्शनास आले. घरातील कपाटाची उचकापाचक करण्यात आली होती. तपासणी केली असता डब्यात ठेवलेले सोन्याचे दागिने गायब असल्याचे समोर आले.

चोरट्यांनी ८९ हजार रुपये किमतीचे ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगलसूत्र आणि १२ हजार रुपये किमतीची ४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, असा एकूण १ लाख १ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही चोरी ४ ऑक्टोबरच्या रात्री ११ ते ५ ऑक्टोबरच्या सकाळी ६ या कालावधीत झाल्याचा अंदाज आहे.गायकवाड यांच्या फिर्यादीवरून बेलवंडी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली, विद्यार्थी ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी करावी, आदिवासी विकास मंत्री यांचा राजीनामा घ्यावा, आदिवासी आयुक्त यांची बदली करावी. मुलभूत सुविधा मिळाव्यात,या मागण्यांसाठी राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांनी चालविलेले आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न आज पोलिसांकडून करण्यात आला . पोलिसांनी या विद्यार्थ्यांना मुंबईच्या टिळक भवन येथून ताब्यात घेतले पोलिसांकडून आदिवासी विद्यार्थ्यांना आझाद मैदानात आंदोलन करण्यास परवानगी नाकारल्यानंतर आझाद मैदानात आंदोलन करु द्या, अन्यथा राज्यपाल यांना भेटू द्या, अशी आदिवासी विद्यार्थ्यांची मागणी होती परंतु पोलीसांनी आदिवासी विद्यार्थ्यांची मुस्कटदाबी केली. आज दुपारी पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

मागील दोन वर्षात आश्रमशाळेतील ६०० विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, याची निष्पक्ष चौकशी करावी, आदिवासी विकास मंत्री यांचा राजीनामा घ्यावा, आदिवासी आयुक्त यांची बदली करावी. मुलभूत सुविधा मिळाव्यात, सेंट्रल किचन मधून येणाऱ्या जेवणाचा दर्जा चांगला नसतो. आमच्या मुलामुलींना पोलीस त्रास देत आहेत. आझाद मैदानावर आंदोलन करण्याची परवानगी द्यावी अन्यथा राज्यपाल यांना भेटू द्यावे, आम्हाला आमच्या समस्या मांडायच्या आहेत, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

टिळक भवनात प्रवेश करून दडपशाही का केली असा जाब यावेळी काँग्रेस नेत्यांनी विचारला. बेकायदेशीरपणे पक्ष कार्यालयात शिरलात का व कशासाठी याचे समाधानकारक उत्तर पोलिसांना देता आले नाही. भाजपा सरकार पोलिसांना पुढे करून गुंडगिरी करत आहे, ती आम्ही खपवून घेणार नाही असा खणखणीत इशारा काँग्रेसने दिला.

## राज्यात १० टक्के पाणीकपात लागू : दोन दिवसांत दौरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** दुष्काळाच्या तीव्र झळा सोसणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक येत्या दोन दिवसांत महाराष्ट्रात दाखल होणार आहे. अहिल्यानगर-सोलापूरसह तीन भागांत केंद्रीय पथकांकडून दुष्काळाची पाहणी केली जाणार असून, त्याचा अहवाल राज्यातील दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, राज्यातील शहरी व ग्रामीण भागात १० टक्के पाणीकपात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. केंद्रीय पथक १० किंवा १२ ऑक्टोबरदरम्यान राज्यात येण्याची शक्यता असून, तीन पथकांमार्फत बीड-धाराशिव, यवतमाळ-वाशिम आणि अहिल्यानगर-सोलापूर या जिल्ह्यांचा आढावा घेतला जाणार आहे. राज्यात आतापर्यंत ४५ टक्के पीक पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित पंचनामे वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पीकविमा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याबरोबरच दुष्काळग्रस्त शेतकरी कोणत्याही योजनेपासून वंचित राहू नये, यासाठी गावनिहाय वारस नोंदी व केवायसी पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

### बँकांकडून शेतकऱ्यांना त्रास दिल्यास कारवाई

**दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी वारंवार फोन करून त्यांना त्रास देणाऱ्या राष्ट्रीयीकृत, खासगी बँका तसेच वित्तसंस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा बावनकुळे यांनी दिला. राज्यात आतापर्यंत केवळ ८ टक्के पीक कर्जवाटप झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. एकदा पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांकडे पुन्हा पुन्हा कागदपत्रांची मागणी करू नये, असे निर्देश देण्यात आले.**

### चारा टंचाईवर 'चारा बँक'

दुष्काळात पशुधन वाचविण्यासाठी वन विभाग, पडीक जमीन तसेच जलसंपदा विभागाच्या तलावालगतच्या शासकीय जमिनींवर 'ग्रासलँड डेव्हलपमेंट' करून मोठ्या चारा बँका उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. चारा छावण्यांऐवजी ग्रामपंचायतीमार्फत चारा डेपो उभारण्याच्या प्रस्तावावरही चर्चा झाली. विदर्भ व कोकणातील भाताची पेंडी न जाळता तिच्यापासून जनावरांसाठी खाद्य तयार करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

### बांधकामांसाठी पिण्याचे पाणी बंद

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बांधकामांसाठी शुद्ध किंवा पिण्याचे पाणी वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली असून, त्यासाठी प्रक्रिया केलेले सांडपाणीच वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. पाण्याचे नियोजन, भूजल पुनर्भरणासाठी रिचार्ज शाफ्ट, बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना सुरू करणे तसेच जलसाठ्यांतील गाळ काढण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. पाण्याची उपलब्धता असलेल्या भागांत रब्बी हंगामात हरभरा आणि ज्वारीला प्राधान्य देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे केंद्रीय पथकाच्या अहवालाकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी आणि प्रशासनाचे विशेष लक्ष लागले आहे.

## दोन मुलांसह महिलेच्या आत्महत्येप्रकरणी पती विरोधात गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील गणेशनगर परिसरात सोमवारी हृदयद्रावक घटना घडली. विवाहित महिलेने आपल्या दोन मुलांसह जीवन संपवले. वंदना गणेश गाडे तसेच त्यांची मुले चैतन्य आणि जीवन गाडे यांचा घटनेत मृत्यू झाला.



या प्रकरणी वंदना यांचे भाऊ प्रल्हाद नामदेव कोकाटे, रा.जोडवाडी, ता. गेवराई यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती गणेश गाडे याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, वंदना यांचा विवाह २०११ मध्ये गणेश गाडे यांच्याशी झाला होता. लग्नानंतर काही वर्षांनी गणेश हे वंदना यांच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागले. या संशयातून वारंवार वाद होत असून वंदना यांना मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वंदना यांनी वेळोवेळी माहेरी आल्यानंतर पतीच्या संशयी स्वभावाबाबत आणि मारहाणीबाबत कुटुंबीयांना माहिती दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच माहेरच्या कुटुंबीयांनी दिलेले सोन्याचे दागिने पतीने दारू पिण्यासाठी विकल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

**या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वंदना यांच्या हातात एक चिठ्ठी आढळली आहे. शवविच्छेदनाच्या प्रक्रियेदरम्यान ही चिठ्ठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली असून त्यात पती घालून पाडून बोलत असे व नेहमी त्रास देत असत असा उल्लेख असल्याचे समजते. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य अधिक वाढत चालले आहेत.**

ऑगस्ट महिन्यात काकांच्या निधनानंतर माहेरी आलेल्या वंदना यांनी पुन्हा पतीकडून होत असलेल्या त्रासाची माहिती भावाला आणि नातेवाइकांना दिल्याचे सांगण्यात आले आहे. दोन मुलांचा विचार करून संसार टिकवण्याचा सल्ला कुटुंबीयांनी त्यांना दिला होता.

दरम्यान, सोमवारी रात्री सुमारे नऊ वाजता गणेश गाडे यांनी वंदना यांच्या भावाला फोन करून वंदना यांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली. त्यानंतर ही धक्कादायक घटना समोर आली.